**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे :

| अ. क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) |
|---|---|---|---|---|---|
| १ | १९०३ / पुणे | श्री. रुद्र विलास प्रभाकर ५८७, बुधवार पेठ, पुणे-२ | निवासी नायब तहसीलदार, वेल्हा, ता.वेल्हा, जि. पुणे | तहसीलदार, वेल्हा, ता.वेल्हा, जि. पुणे | मौजे साईब बु. ता. वेल्हे येथील गट नं.९५,९७, १०१ येथील ७/१२ संगणकीय उताऱ्यांच्या चालू सत्य प्रती |
| २ | ९९१ / पुणे | श्री. प्रमोद रामाराव देशमुख सौ. अनुराधा प्रमोद देशमुख रा.फ्लॅट नं.१२, सिध्दार्थ सोसायटी, डी.पी.रोड मेडी पाईंट हॉस्पिटल जवळ, औंध, पुणे-७ | निवासी नायब तहसीलदार, हवेली, ता. हवेली, जि. पुणे | तहसीलदार, हवेली, ता. हवेली , जि. पुणे | मौजे धनकवडी ता. हवेली सर्व्हे नं.२४/७/२अ+ २४/ २अ+२ या मिळकतीबाबत करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती |
| ३ | १८९२ / पुणे | सौ.साधना राजाराम दांडेकर रा. ५८७, बुधवार पेठ, पाटील सदन, पुणे-२ | सह दुय्यम निबंधक क्र.२, शुक्रवार पेठ, पुणे-२ | सह जिल्हा निबंधक वर्ग-१, पुणे ग्रामीण, पुष्पमंगल कार्यालय, बिबवेवाडी, पुणे | मौजे मोशी ता. हवेली येथील स.नं. ३९, ३०, ४१ व ४७ यांचा नवीन गट नं.४४२ मधील जमिनीचा दस्तनंबर ४३३६/९८ दि. १४.१०.१९९८ च्या दस्ताची सत्यप्रत |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४ | १७७२ / पुणे | श्री. अनिल गांधी<br>रा. २५०, नारायण पेठ, गांधी हॉस्पिटल,<br>पुणे-३० | अप्पर जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी, पुणे नागरी, समूह पुणे यांचे कार्यालय, पीएमटी कमर्शिअल कॉम्प्लेक्स, पुणे३७ | अप्पर जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी, पुणे नागरी, समूह पुणे, पीएमटी कमर्शिअल कॉम्प्लेक्स, पुणे-३७ | सदर कार्यालयाचे आदेश क्र. युएलसी/का.१ /टे.नं.६/६४५/२००१ दि. २६.१२.२००१ ची प्रत |
| ५ | १९९२+ १९९३ / पुणे | श्री. वैभव मधुसदन लिमये<br>रा. श्री. लक्ष्मी निवास अपार्टमेंट, प्लॉट नं. ६, फ्लॅट नं.३३, युनायटेड वेस्टर्न सोसायटी, कर्वेनगर, पुणे-५२ | सहाय्यक संचालक नगर रचना, पुणे विभाग, २८३, नारायण पेठ, पुणे-३० | उप संचालक, नगर रचना पुणे विभाग ७४/२, सहकारनगर, पुणे-९ | मौजे भूगांव, ता. मुळशी येथील स.नं. ४६४ चा झोन दाखला |
| ६ | १९८२ + १९८३ / पुणे | श्री. प्रमोद विनायक सुर्यवंशी<br>रा. स.नं. ४१/ब/१, जाधवनगर, वडगाव बु., ता. हवेली, जि. पुणे | सहाय्यक संचालक नगर रचना, पुणे विभाग, २८३, नारायण पेठ, पुणे-३० | उप संचालक, नगर रचना पुणे विभाग ७४/२, सहकारनगर, पुणे-९ | मौजे कासुर्डी, ता. हवेली येथील सर्व्हे नं.१४ मधील सरकार प्रस्तावित रस्ता दर्शविणाऱ्या नकाशाच्या सत्य प्रती |
| ७ | २१४२ /पुणे | श्री. दगडु बाबूराव शिंदे, रा. २१/अे, लक्ष्मी पॅलेस, औंधगाव गुरूद्वाराजवळ, पुणे-७ | उप अभियंता, नगर रचना व विकास विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-१८ | अभियंता, नगर रचना व विकास विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-१८ | मौजे रहाटणी, ता. हवेली येथील स.नं.३३/१/३/१ या जमिनीचा वापर कोणत्या कारणासाठी करण्यात येणार याचा झोन दाखला |
| ८ | २४०६ / पुणे | सौ. सरोज जगदिश लाटे<br>द्वारा श्री. पाटील<br>रा. ५८७, बुधवार पेठ, पाटील सदन, पुणे-२ | गाव कामगार तलाठी, कासार - अंबोळी, ता. मुळशी, जि. पुणे | मंडलाधिकारी कासार-अंबोली ता. मुळशी, जि. पुणे | मौजे कासार-अंबोली, ता. मुळशी येथील गट नं. १९७ पैकी ०-३३ आर जमीन दस्त नं. ४३४२/०६ दि. ३०.९. २००६ रोजी खरेदी केली या |

या सर्व अपिलांमध्ये पूर्ण कागदपत्रे सादर केलेली नाहीत. तसेच अपीलकर्त्याच्या वेगवेगळ्या कागदपत्रांवरील स्वाक्षऱ्यांमध्ये तफावत आहे. स्वाक्षरीतील फरकामुळे त्यांच्या अधिकृततेविषयी साशंकता निर्माण होते. तसेच कार्यवाही करावी व त्याची माहिती द्यावी, अशी मूळ मागणी आहे. ते माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील 'माहिती'च्या व्याख्येशी सुंसगत नाही. हे लक्षात घेता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

वरील सर्व अपिले (क्र.१९०३, ९११, १८९२, १७७२, १९९२, १९९३, १९८२, १९८३, २१४२ व २४०६ ) निकाली काढण्यात येत आहेत.

पुणे
दि. २९ .१२.२००८

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे प्राप्त झालेल्या खालील अपिलांच्या प्राथमिक छाननी अंती पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे:

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी संक्षिप्त | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २०११/ पुणे | श्री.राचय्या बाळय्या झुलपी स.नं.३७, ससाणे कॉलनी, केशवनगर,मुंढवा, पुणे-३६ | चिटणीस, महसूल शाखा, पुणे विभागीय आयुक्त कार्यालय, विधानभवन, पुणे -१ | उपायुक्त, (महसूल ) शाखा, पुणे विभागीय आयुक्त कार्यालय, विधानभवन, पुणे -१ | पाईपलाईन टाकण्यास शेत मालकाची पूर्व संमती घेण्याची आवश्यकता आहे किंवा नाही व अनुषंगिक मुद्दे. | कार्यवाहीची मागणी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही. |
| २ | २६०६/ पुणे | कु.स्मिता हरिश्चंद्र पवार रा.१८, धोबी चाळ, लाला निगम रोड, कुलाबा, मुंबई-५ | निवासी नायब तहसीलदार, राजगुरुनगर, खेड तहसील कार्यालय, ता.खेड, जि.पुणे | तहसीलदार, राजगुरुनगर, खेड तहसील कार्यालय, ता.खेड, जि.पुणे | मौजे पूर, ता.खेड येथील गट क्र.२९०, २६२,२९२, २९४,९२२ चे कडईपत्रक, आरटीएस फाईल नक्कल. | जन माहिती अधिकाऱ्यांनी नक्कला त्वरित द्याव्यात. |
| ३ | २६०९/ पुणे | श्री.हरिश्चंद्र बाबुराव धस द्वारा मुकेश सुरेश चव्हाण स.नं.२२/१/१ समर्थ हॉस्पिटल जवळ, थिटेनगर, खराडी, पुणे -१४ | शासकीय माहिती अधिकारी, दुय्यम निबंधक , हवेली क्र.२, बिबवेवाडी, पुणे -३७ | सहाय्यक जिल्हा निबंधक, शासकीय फोटो झिंको, पुणे - १ | मौजे खराडी येथील सर्व्हे नं.१४/१/१ बाबतचा दस्त क्रमांक ६१५१ नोंदविणाऱ्या अधिकाऱ्याची माहिती इ. | संभाव्य कार्यवाहीचा विषय 'माहिती' ठरत नाही |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | २६११/ पुणे | ॲड.नितीन यु.भंडारे कुदळे पाटील पॅलेस फ्लॅट नं.१४, माणिकबाग बस स्टॉपजवळ, सिंहगड रोड, पुणे- ५१ | माहिती अधिकारी तथा:आयुक्त यांचे प्रमुख लिपीक, सामान्य प्रशासन विभाग, विभागीय आयुक्त कार्यालय, विधानभवन , पुणे -१ | उपआयुक्त , सामान्य प्रशासन, विधान भवन, पुणे विभाग, पुणे-१ | एअर फोर्स स्टेशन, लोहगाव बाबत संबंधित अधिकाऱ्यांशी सन १९९८ पासून ते आजपर्यंत झालेल्या सभांमधील निर्णय / आदेश | १) मागणी संदिग्ध आहे.नेमकी माहिती मागावी. २)माहितीचा अर्ज सदस्य सचिव, एअर ऑफिसर कमांडिंग यांना पाठविण्यात यावा.हा अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेला निर्णय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार योग्य नाही. |
| ५ | २६१४/ पुणे | श्री.तानाजी मारुती मांडवे २/१, लालबहादूर शास्त्रीनगर, से.नं.२७(अ), प्राधिकरण, निगडी, पुणे -४४ | कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, सातारा मंडळ वडूज, पुसेगाव रोड, वडूज, ता.खटाव, जि.सातारा | अधिक्षक अभियंता, विद्युत वितरण कंपनी लि. , प्रशासकीय इमारत, १ ला मजला, विद्युत भवन, कृष्णानगर, जि.सातारा | नोव्हेंबर २००७ ते मे २००८ या सात महिन्यात किती एल.टी.कंडक्टर उपलब्ध झाले . खटाव व माण तालुक्याला किती दिले, तद्नुषिंग ६ मुद्यांची माहिती | माहिती त्वरीत देण्यात यावी. |
| ६ | २६१५/ पुणे | श्री.गंगभिसनभाई ओझा छत्रपती शिवाजी चौक, ता.दौंड,जि.पुणे | माहिती अधिकारी (दुकाने विभाग), कामगार उप आयुक्त, पुणे जिल्हा कार्यालय, शिवाजीनगर, पुणे -५ | सहाय्यक कामगार आयुक्त, कामगार उपआयुक्त, पुणे जिल्हा यांचे कार्यालय, शिवाजीनगर, पुणे -५ | निरीक्षकांनी जाणून बुजून नाकारलेल्या दाखला अर्जाबाबत उपायुक्त यांनी दिलेल्या आदेशांचे पालन न झाल्याबद्दल व अनुषंगिक मुद्दे | दाखला देणे वा न देणे हा विषय माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही. तसेच भाष्य, खुलासा, अन्वयार्थ यांची मागणी 'माहिती' म्हणून करता येणार नाही. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१) अपिले निकाली काढण्यात येत आहे.

२) अपील क्रमांक २६०६ मधील जन माहिती अधिकारी यांनी नकला अपीलकर्त्यास त्वरीत द्याव्यात व त्याचा पूर्तता अहवाल या आदेशापासून ८ दिवसांच्या आत आयोगास सादर करावा.

३) अपील क्रमांक २६०९ मधील जन माहिती अधिकारी यांनी देय माहिती या आदेशापासून ८ दिवसांचे आत अपीलकर्त्यांना द्यावी. तसेच अपील क्रमांक २०११ व २६१५ मधील जन माहिती अधिकारी यांनी संबंधित प्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती या आदेशापासून ८ दिवसांचे आत अपीलकर्त्यांना द्यावी.

४) उपरोक्तनुसार पूर्तता न झाल्यास संबंधित अधिकारी नियमानुसार शास्ती व अन्य योग्य त्या कारवाईस पात्र ठरतील.

**पुणे**
**दिनांक : ३१.१२.२००८**

**( विजय कुंवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे :

| अ. क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २०२७ / पुणे | श्री. इंद्रजीत बनारसीदास आगरवाल रा.कळस, आळंदी-रोड, सर्व्हे नं.११६, पुणे-१५ | कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक, पुणे-१ | अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, मध्यवर्ती इमारत, पुणे-१ | सन १९९७ च्या प्रादेशिक आराखड्यातील कळसमधून आळंदीकडे जाणा-या रस्त्याबाबत एकूण ४ मुद्दयांची माहिती | आवश्यक ती माहिती मिळाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |
| २ | २०२१ / पुणे | श्री. अनिल जयसिंगराव शितोळे रा. १०२, कसबा पेठ, पुणे | नगर भूमापन अधिकारी, तहसील कार्यालय हवेली आवार शुक्रवार पेठ, पुणे-२ | अधीक्षक भूमि अभिलेख, जिल्हाधिकारी कार्यालय, आवार, पुणे-१ | पुणे भांबुर्डा न.भू.क्र.११८७/६५, फायनल प्लॉट नं.५४७/६५ या मिळकतीचे मूळ सर्व्हे शीट, क्षेत्र पुस्तक व चौकशी नोंदवहीची नक्कल | आवश्यक ती माहिती मिळाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ३ | १८२९ / पुणे | श्री. सुनिलकुमार बावधनकर चोपडे एजन्सीज, हिरामण लांडे बिल्डिंग, मुंबई-पुणे रोड, कासारवाडी, पुणे-३४ | तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, बारामती, ता.बारामती जि.पुणे | अधीक्षक भूमि अभिलेख, जिल्हाधिकारी कार्यालय, आवार, पुणे | सन १९८८ ते २००७ या कालावधीत मौजे बारामती व माळेगाव बु. येथील कोणत्या सरकारी मिळकती ९९ वर्षांच्या कराराने अगर भाडे तत्वावर दिल्या गेल्या याची माहिती | आवश्यक ती माहिती मिळाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | २०१० / पुणे | श्री. बाळासाहेब महादेव शितोळे, रा. राम मंदिरा समोर, नर्सेस क्वार्टर्स, खडकी, पुणे-३ | उपविभागीय पोलीस अधिकारी, दौंड विभाग, दौड, जि. पुणे | अप्पर पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण, पाषाण, पुणे | यवत पोलीस स्टेशन अ.म.र.नं.६२/९८, सी.आर.पी.सी.१७४ च्या अनुषंगाने ६ मुद्दयांची माहिती | आवश्यक ती माहिती मिळाल्याचे अपीलकर्त्यांने प्रपत्रात नमूद केले आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

वरील सर्व अपिले (क्र. २०२७, २०२१, १८२९, २०१०) निकाली काढण्यात येत आहेत.

**पुणे**
**दि. ३१.१२.२००८**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे घविशेष अपील निर्गत कार्यक्रमङ दिनांक १६.१२.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात अपीलकर्ता श्री.मोहन श्रीपाद घाटपांडे. मु.पो.वेल्हे, ता.जुन्नर, जि.पुणे यांच्या खालील अपिलाचा समावेश होता.

| अ. क्र. | अपील क्रमांक | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|
| १ | २०८१ / पुणे | तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, जुन्नर, जि.पुणे | अधीक्षक, भूमी अभिलेख, जि.पुणे-१ | मौजे बेल्हे, ता.जुन्नर येथील सर्व्हे नं.२७१ चे मो.र.नं.२२२ बाबत मोजणीसंबंधी (अतिक्रमण हटविण्याबाबत) माहिती | जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत कळविल्याप्रमाणे शुल्क भरुन अपीलकर्त्याने आवश्यक असल्यास माहिती प्राप्त करुन घ्यावी. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. २३-१२-२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दिनांक १६-१२-२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता :

| अ क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नांव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २१०५ / पुणे | श्री.रमेश किसन मराठे १५४-ब, घोरपडी गाव, पुणे - ४११ ००१ | उपनिबंधक, सहकारी संस्था पुणे शहर (२) पुणे यांचे कार्यालय, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे-५ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था पुणे शहर (२) पुणे यांचे कार्यालय, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे-५ | दि. ०१-४-२००६ ते २२-५-२००८ या कालावधीतील रु.१९१००/- ठेवीवर व्याज मिळावे | अपील निकाली काढण्याबाबत एकमत. मागणी माहितीचा अधिकार अधिनियमात येत नाही. मात्र मागणी-नुसार कार्यवाही करण्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले. |
| २ | २१२५ / पुणे | श्री.नेमचंद तुळशीराम काळे शिवनेरी सह.गृह.संस्था, बारामती एमआयडीसी, जुन्या पिल्ले गॅरेज शेजारी, बारामती, पुणे | निवासी नायब तहसीलदार, उत्तर सोलापूर, ता.उत्तर सोलापूर, जि.सोलापूर | तहसीलदार, उत्तर सोलापूर, ता.उत्तर सोलापूर, जि.सोलापूर | दि. ११-१०-१९९१ व फेरफार नं.८१९ अन्वये बिनशेती करण्यात आलेल्या जमिनीबाबत | अपील निकाली काढण्याबाबत एकमत. अपीलकर्त्याच्या मागणीबाबत १५ दिवसात कार्यवाही करण्याचे ठरले. |
| ३ | २१२४ / पुणे | श्री.नेमचंद तुळशीराम काळे, शिवनेरी सह.गृह.संस्था, बारामती एमआयडीसी, जुन्या पिल्ले गॅरेज शेजारी, बारामती, पुणे | निवासी नायब तहसीलदार, उत्तर सोलापूर, ता.उत्तर सोलापूर, जि.सोलापूर | तहसीलदार, उत्तर सोलापूर, ता.उत्तर सोलापूर, जि.सोलापूर | दि. २४-९-२००७ व ३१-१०-२००७ च्या अर्जांवर फेब्रुवारी २००८ अखेर केलेल्या कार्यवाहीबाबत माहिती | अपील निकाली काढण्याबाबत एकमत. अपीलकर्त्याच्या मागणीबाबत १५ दिवसात कार्यवाही करण्याचे ठरले. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | २१०८ / पुणे | श्री.दशरथ नानासाहेब राऊत मु.पो.खांडज, ता.बारामती, जि.पुणे | सचिव, शिवनगर विद्या प्रसारक मंडळ, माळेगाव बु., ता.बारामती, जि.पुणे | चेअरमन, शिवनगर विद्या प्रसारक मंडळ, माळेगाव बु., ता.बारामती, जि.पुणे | सचिव, शिवनगर विद्या प्रसारक मंडळ, माळेगाव च्या तंत्रनिकेतनमध्ये २००६ मध्ये शासन मान्यता न घेता आरक्षण डावलून शिक्षक पदावर केलेल्या नेमणुकांबाबत माहिती | माहितीबाबत अपीलकर्त्याचे समाधान झाले. |
| ५ | २०९७ / पुणे | श्री.विलास बाबुराव सगरे जय शिवाजी निवास रुम नं.३, विनोद वस्ती मारुंजी डांगे चौक रोड, हिंजवडी, ता.मुळशी, जि.पुणे-५७ | ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय ऐनवाडी (अगस्तीनगर), ता.खानापूर (विटा), जि.सांगली | उपसंचालक, विभागीय माहिती कार्यालय, महाराष्ट्र शासन, प्रशासकीय इमारत, कसबा बावडा रोड, डी.एस.पी. कार्यालयाजवळ, कोल्हापूर-१ | ऐनवाडी येथील नळ पाणी पुरवठा एस्टिमेट, घरकुल योजना, इ. बाबत माहिती | माहितीबाबत अपीलकर्त्याचे समाधान झाले. तसे अपीलकर्त्याने लेखी दिले. |
| ६ | २१३८ / पुणे | श्री.ज्ञानोबा शंकर कोद्रे मुंढवा फ्लोरीडा इस्टेट, पुणे -३६ | पोलीस उपायुक्त, परिमंडळ-४, पुणे शहर पुणे | पोलीस आयुक्त, परिमंडळ-४, पुणे शहर, पुणे | मुंढवा केशवनगर ग्राम पंचायत तंटामुक्ती समितीने तक्रारीची दखल न घेतलेबाबत | माहितीबाबत अपीलकर्त्याची तक्रार नसल्याचे अपीलकर्त्याने लेखी दिले. |

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्यातील चर्चेअंतीचा निष्कर्ष नोंदवून त्यानुसार कार्यवाहीचे आदेश देऊन ही अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

## आदेश

(१) वरील तक्त्यात नमूद केलेली अपिले (क्र. २१०५, २१२५, २१२४, २१०८, २०९७ व २१३८ / पुणे ) निकाली काढण्यात येत आहेत.

(२) अपील क्रमांक २१०५, २१२५ व २१२४ / पुणे मध्ये नमूद केल्यानुसार संबंधित जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करुन पूर्तता अहवाल आयोगास सादर करावा.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २३-१२-२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.२३.१२.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता :

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २१४४/ पुणे | श्री.सुरेश रंगनाथ तापकीर पुणे - आळंदी रस्ता, आळंदी देवाची, ता.खेड, जि.पुणे | कनिष्ठ अभियंता, आळंदी नगरपरिषद, आळंदी देवाची, ता.खेड, जि.पुणे | मुख्याधिकारी, आळंदी नगरपरिषद, आळंदी देवाची, ता.खेड, जि.पुणे | सर्व्हे क्र.९२३ जुना, नवा १२३, श्री.संपत व प्रकाश गोविंदराव पानसरे यांचे मालकीचे 'हॉटेल आराधना'च्या नवीन बांधकामाबाबत मार्च २००५ ते आजपर्यंतची माहिती | अर्जानुसार व नियमानुसार जी अनुज्ञेय माहिती आहे, ती माहिती अपीलकर्त्यास १० दिवसांत देण्याचे ठरले. |
| २ | २१४६/ पुणे | श्री.संभाजी मधुकर चव्हाण मु.पो.रेडणी, ता.इंदापूर, जि.पुणे | ग्रामसेवक, ग्रामपंचायत, मेखळी, ता.बारामती, जि.पुणे | विस्तार अधिकारी, पंचायत समिती बारामती, ता.बारामती, जि.पुणे | सन १९८७ ते २००८ मध्ये दलित वस्ती साठी घरकुल व घरदुरुस्ती लाभार्थींची यादी व खर्च अनुषंगिक मुद्दे | माहिती अधिकाऱ्यांनी माहिती ८ दिवसात दिल्यास अपीलकर्ता त्यासाठी लागणारे शुल्क भरण्यास तयार असल्याचे प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ३ | २१६७/ पुणे | श्री.अर्जुन वसंत भिसे मु.पो.देऊळगाव रसाळ, ता.बारामती, जि.पुणे | ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, देऊळगाव रसाळ, ता.बारामती, जि.पुणे | विस्तार अधिकारी (उद्योग), पंचायत समिती बारामती, ता.बारामती, जि.पुणे | दि.३०.५.२००६ रोजीचे ग्रामसभेचे प्रोसीडिंग, दारिद्र्य -रेषेखालील कुटुंबांची गणना २००२ ची यादी इ. | अपीलकर्ता गैरहजर. तथापि माहितीबाबत अपीलकर्त्याशी संपर्क साधून व्यवस्थित / समाधान होईल अशी माहिती देण्यात येईल, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | २१७८/ पुणे | श्री.राजू रामचंद्र सावले डेक्कन कॉलेज कॅम्पस, येरवडा, पुणे - ६ | प्रशासन अधिकारी, शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, मध्यवर्ती इमारत, पुणे - १ | शिक्षण संचालक, शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, मध्यवर्ती इमारत, पुणे - १ | माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम (च) नुसार मागितलेली माहिती | यापूर्वी माहिती दिलेली आहे, तरीही १० दिवसात सुधारीत माहिती देण्यात येईल, असे प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ५ | २१८१/ पुणे | श्री.दत्तात्रय विष्णू सोनवणे आय -१०८, शासकीय निवासस्थान येरवडा, पुणे - ६ | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग पुणे, पुणे -१ | अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग पुणे, पुणे - १ | शासकीय निवासस्थान शास्त्रीनगर, येरवडा, पुणे देखभाल व दुरुस्तीबाबतची माहिती | माहिती तयार असून अपीलकर्त्याने माहिती व्यक्तीश: नेलेली नाही, असे जन माहिती अधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ६ | २१८३/ पुणे | श्रीमती वर्षा विनायक कांबळे द्वारा एम.आर. वाघमारे, लुंबिनी, समृध्दीनगर, राजगुरुनगर, ता.खेड,जि.पुणे | मुख्याध्यापक, गुरुवर्य रा.प.सबनीस विद्या मंदिर वारुळवाडी, नारायणगाव, ता.जुन्नर, जि.पुणे | शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद पुणे, पुणे - १ | शैक्षणिक वर्ष सन १९८८ ते २००७-२००८ या कालावधीतील शाळेच्या कामकाजाच्या अनुषंगाने ६ मुद्यांबाबत माहिती | रजिस्टर पोस्टाने ३ दिवसात माहिती देण्यात येईल, असे जन माहिती अधिकाऱ्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ७ | २२२८/ पुणे | श्री.पंडीत भीमराव जगताप ५४८, कृष्णकुंज निवास पारिजात कॉलनी, हडपसर, पुणे - २८ | सचिव, अकुलगाव विविध सेवा सहकारी संस्था मर्या.अकुलगाव, ता.माढा, जि.सोलापूर | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था माढा, जि.सोलापूर | दि.१८.०८.२००० चे इकरारपत्र, कर्ज मागणी अर्ज व मुद्दल व्याज अनुषंगिक ७ मुद्यांची माहिती | माहिती तयार असून ती आज (दि.२३.१२.२००८) रोजी देण्यात येत आहे, असे प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ८ | २२८३/ पुणे | श्री.दिलीप खंडेराव पानसे तुळजाई, संत गंगानाथ महाराज सो., सहकारनगर क्र.२, पुणे - ९ | सहाय्यक पोलीस आयुक्त, खडकी विभाग, पुणे -३ | पोलीस उपायुक्त मुख्यालय, पुणे पोलीस आयुक्तालय, पुणे - १ | दि.०२.०५.२००८ ते दि.०९.०५.२००८ या कालावधीत मुळा नदीत आढळलेल्या मृतदेहांबाबतची माहिती | माहिती देण्यात आली आहे, अपीलकर्त्याचे समाधान झाले आहे, असे जन माहिती अधिकाऱ्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |

वरील तीनही घटकांमधील चर्चा, त्यांनी सादर केलेली निवेदने व चर्चेअंतीचा निष्कर्ष विचारात घेता उभय बाजूंचे माहितीबाबत व अपील निकाली काढण्याबाबत एकमत झाले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१) वरील तक्त्यातील अपिले ( क्रमांक २१४४, २१४६, २१६७, २१७८, २१८१, २१८३, २२२८ व २२८३ ) निकाली काढण्यात येत आहेत.

२) वरील अपिलांमध्ये जन माहिती अधिकारी यांनी विहित कालावधीत माहिती उपलब्ध करुन देण्याची दक्षता घेणे आवश्यक होते. त्यानुसार आयोगाकडील 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' पर्यंत अर्जदारांना माहितीपासून वंचित ठेवण्याबाबात / झालेल्या विलंबाबाबत संबंधित जन माहिती अधिकाऱ्यांना समज देण्यात येत आहे.

३) अपील क्रमांक २१४४, २१४६, २१६७, २१७८, २१८१ व २१८३ प्रपत्रात नमूद केल्यानुसार विहित मुदतीत कार्यवाही करुन जन माहिती अधिकारी यांनी अनुपालन अहवाल ८ दिवसांत आयोगास सादर करावा. त्यानुसार पूर्तता न झाल्यास ते कारवाईस पात्र राहतील.

पुणे
दि. ३१.१२.२००८

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.२३.१२.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी |
|---|---|---|---|---|---|
| १ | २१४८ | ॲड.स.भा.रेपाळे ९ झेड, राजमयूर सोसायटी नं.२, एरंडवणा गावठाण, पुणे | जन माहिती अधिकारी, नागरी जमीन कमाल धारणा कार्यालय, पुणे नागरी समूह, पुणे | अप्पर जिल्हाधिकारी, नागरी समूह, स्वारगेट, पुणे | नागरी कमाल धारणेच्या आदेशानुसार अतिरिक्त झालेल्या जमिनीचे वाटप / उपयोग शासनाने कशा प्रकारे केला आणि त्या जमीनधारकांना अदा केलेल्या रक्कमेची माहिती |
| २ | २२३३ | श्री.रतन गुलाब चौधरी तर्फे ॲड.जोतिबा मरगुणी १५/७, सिध्दीविनायक हाईटस, धनकवडी, पुणे | तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख कार्यालय, हवेली, जि.पुणे | अधीक्षक, भूमी अभिलेख, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे | मौजे नायगाव, ता.हवेली, जि.पुणे येथील ४४१,४४२,४४३ व ४७३ या शेत जमिनीच्या मोजणीच्या अनुषंगाने |
| ३ | २१६२ | श्री.राजेंद्र रामचंद्र इंगवले राहूल चेंबर्स, १४, एरंडवणा, कर्वे रोड, पुणे | निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, खंडाळा, जि.सातारा | तहसीलदार, तहसीलदार कार्यालय, खंडाळा, जि.सातारा | सन १९८९ ते २००७ या कालावधीत श्री.प्रशांत हिंगमिरे, रा.लोणंद, ता.खंडाळा व श्री.सूर्यकांत कुबेरदास गांधी,रा.खेड बु., ता.खंडाळा यांच्या सरकारमान्य रेशन दुकानाबाबत माहिती |
| ४ | २१६९ | श्री.जनार्दन विठ्ठल पांढरीकामे मु.थोरातवाडी, पो.न्हावी, | सचिव, रुई विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था | सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, इंदापूर, | सदर संस्थेच्या सभासद शेअर्स कर्ज इत्यादीबाबत एकूण २१ मुद्यांची माहिती |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | ता.इंदापूर, जि.पुणे | मर्या, रुई, ता.इंदापूर | ता.इंदापूर, जि.पुणे | |
| ५ | २२८० | श्री.श्रीपती मारुती थोरात २४९/५, कलापूर्ण निवास, लक्ष्मी सॉ मिल शेजारी, लोणावळा, ता.मावळ, जि.पुणे | उपविभागीय पोलीस अधिकारी, लोणावळा, जि.पुणे | अपर पोलीस अधिक्षक, पुणे ग्रामीण, पाषाण, पुणे | अपीलकर्त्याच्या विरोधात दि.१०.०१.२००८ रोजी दिलेल्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने एकूण ३ मुद्यांची माहिती |
| ६ | २२२६ | श्री.जगन्नाथ शंकर होळकर रा.होळ, (सदोबाची वाडी), ता.बारामती, जि.पुणे | अपर पोलीस उप आयुक्त (१), ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे | पोलीस उप आयुक्त, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे | माहे ऑगस्ट व सप्टेंबर २००५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे पिकांचे झालेले नुकसान व त्यामध्ये झालेल्या भ्रष्टाचाराची माहिती |
| ७ | २१५६ | श्री.प्रविण गणपत खरात रुपरंग जनरल ॲन्ड प्रोव्हिजन स्टोअर्स, एस.टी.स्टॅन्ड, शिरुर, जि.पुणे | विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ, पुणे, शंकरशेठ रोड, पुणे | नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ, पुणे, शंकरशेठ रोड, पुणे | महामंडळाचे नियम, अटी शर्ती तसेच परवानाधारकासाठी असलेल्या नियमावलीच्या अनुषंगाने एकूण ३४ मुद्यांची माहिती |

वरील तीनही घटकांमधील चर्चा, त्यांनी सादर केलेली निवेदने व चर्चेअंतीचा निष्कर्ष विचारात घेता उभय बाजूंचे माहितीबाबत व अपील निकाली काढण्याबाबत एकमत झाले. प्राप्त माहिती समाधान झाले असल्याचे अपीलकर्त्यांनी मान्य केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

वरील अपील क्रमांक २१४८, २२०४, २२३३, २२४६, २१६२, २१६९, २२८०, २२२६ व २१५६ निकाली काढण्यात येत आहेत.

**पुणे**
**दिनांक : २३-१२-२००८**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला, कौंसिल
हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.गोपाळ निवृत्ती दसवडकर
मु.वरसगाव गोरडवाडी, पो.कुरण, ता.वेल्हे, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, ता.वेल्हे, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत वरसगाव, ता.वेल्हे, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१५ / पुणे / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२१.५.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.गोपाळ निवृत्ती दसवडकर
मु.वरसगाव गोरडवाडी, पो.कुरण, ता.वेल्हे, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, ता.वेल्हे, जि.पुणे प्रतिनिधी श्री.ए.बी.मदने

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत वरसगाव, ता.वेल्हे, जि.पुणे श्री.एस.पी.उदुगडे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १०.५.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २६.७.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २६.६.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>सन २००१ ते २००६ या कालावधीमध्ये ग्रामस्थांकडून दरवर्षी कर रुपाने पैसे घेतले जात आहेत त्याची माहिती. वीज व्यवस्था गेल्या पाच वर्षांपासून बंद आहे, तरीही वीजकर जमा केला आहे, तो किती आहे व मागणी केल्यावर तो ग्रामस्थांना परत देणार काय? २००६ सालातील रस्त्याच्या कामाबद्दल पंचायतीची परवानगी घेतली होती काय? घेतली असल्यास त्याची प्रत. पंचायत सभासदांची तीन महिन्यांनी मिटिंग होते का व त्या मिटिंगला सर्व सभासद हजर राहतात का याची माहिती. नळकोंडाळे बांधून मिळावे ह्यासाठी ग्रामस्थांच्या सह्यानिशी दोन अर्ज पंचायतीकडे पाठविले आहेत, परंतु पंचायतीने अर्जाची दखल पत्रव्यवहार वा पाहणी केली का, कारणे द्यावीत. तरी ग्रामपंचायतीचा वार्षिक जमा-खर्च व झालेली विकास कामे अशी २००१ ते २००६ पर्यंतची तपशीलवार माहिती. | |

## सुधारित आदेश

**वाचा ::- आयोगाचे समक्रमांकाचे आदेश दि.१०.९.२००८**

## विवेचन

उपरोक्त अपिलावर दि.१०.९.२००८ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार, अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, वेल्हे यांच्याकडून अहवाल मागविण्यात आला होता. अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, वेल्हे, जि.पुणे यांनी त्यांचे पत्र जा.क्र.पंचा/वशी/५२५/वेल्हे, दि.२४.९.२००८ अन्वये आयोगास अहवाल सादर केला आहे.

त्यानुसार, ग्रामपंचायत वरसगावचे तत्कालीन ग्रामसेवक तथा जन माहिती अधिकारी श्री.सी.जी.चव्हाण यांनी अपीलकर्ता श्री.दसवडकर यांना दिलेली माहिती व लेखा परीक्षणात सादर केलेली माहिती यात तफावत दिसून येत आहे.

सन १९९३-९४ ते २००५-०६ कालावधीची माहिती ही संबंधित जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारच्या दप्तराची पडताळणी न करता दिलेली आहे, असे निदर्शनास येत आहे, असे अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी यांनी त्यांच्या निवेदनात विषद केले आहे. ते लक्षात घेता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक श्री.सी.जी.चव्हाण यांनी चुकीची, वस्तुस्थितीशी विसंगत, दिशाभूल करणारी माहिती दिल्याबद्दल त्यांना रु.२५०००/- शास्ती लावण्यात येत आहे. सदरची शास्ती त्यांचे जानेवारी २००९ मध्ये देय असलेल्या डिसेंबर २००८ च्या वेतनापासून पाच हप्त्यात वसूल करुन '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, वेल्हे यांनी करुन पूर्तता अहवाल आयोगाला सादर करावा. तसेच याबाबत त्यांच्या सेवापुस्तकात व गोपनीय अहवालात नोंद घेऊन त्याच्या छायांकित प्रती आयोगाला सादर कराव्यात. ही जबाबदारी अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, वेल्हे यांची राहील.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**(विजय कुंवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.१५.१२.२००८**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे :

| अ. क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २१६१ / पुणे | श्री. नामदेव शामराव नालंदे रा.व्हील कॉलनी, बारामती, जि.पुणे | तालुका कृषि अधिकारी, दौंड, ता.दौंड, जि. पुणे | उप विभागीय कृषि अधिकारी बारामती, ता. बारामती, जि. पुणे | जानेवारी २००७ ते माहे डिसेंबर २००७ पर्यंत सिमेंट नाला बंडीग कामाबाबत एकूण ०४ मुद्दयांची माहिती | कळविलेले शुल्क अपीलकर्त्याने भरलेले नाही. रू.८६४०/- एवढी रक्कम जमा केल्यानंतर माहिती देण्यात येईल असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी नमूद केले आहे. त्यानुसार माहिती आवश्यक असल्यास अपीलकर्त्याने शुल्क भरून माहिती प्राप्त करून घ्यावी. |
| २ | २१४३ / पुणे | श्री. सुरेश रंगनाथ तापकीर रा. पुणे आळंदी रस्ता, देवाची आळंदी, ता . हवेली,जि. पुणे | कनिष्ठ अभियंता, आळंदी नगर परिषद, आळंदी, ता.राजगुरू-नगर,जि. पुणे | मुख्या-धिकारी, आळंदी नगर परिषद, ता.राजगुरू नगर जि. पुणे | वार्ड नं.९,१०,१५, १६ व १७ मधील मिळकतींच्या अनुषंगाने माहिती | जन माहिती अधिकारी /अपिलीय प्राधिकारी यांनी १५ दिवसांत माहिती देण्याचे प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ३ | २२७५/ पुणे | श्री. सुरेश गो. कदम रा.गोदावरी भवन, रूपीनगर, ता.हवेली, जि.पुणे | उप कार्यकारी अभियंता महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, भोसरी, पुणे | नवीन शाखा कार्यालय उघडण्या साठी असलेल्या नियमांची छायांकित प्रत | नवीन शाखा कार्यालय उघडण्यासाठी असलेल्या नियमांची छायांकित प्रत | जन माहिती अधिकारी /अपिलीय प्राधिकारी यांनी ८ दिवसांत माहिती देण्याचे प्रपत्रात नमूद केले आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | २२६८ / पुणे | श्री. केशव शंकर आगवणे मु.पो.लिमटेक, ता. बारामती, जि. पुणे | उप शिक्षणाधिकारी - (प्राथमिक) जिल्हा परिषद, पुणे | शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, पुणे | सन १९९५ ते ३० सप्टेंबर २००७ या कालावधीतील अपंगाच्या सरळसेवा भरतीबाबत एकूण पाच मुद्दयांची माहिती | जन माहिती अधिकारी /अपिलीय प्राधिकारी यांनी एक महिन्यात माहिती देण्याचे प्रपत्रात नमूद केले आहे. माहितीची मागणी केल्यापासून १३ महिन्यांचा कालावधी लोटल्यानंतरही एक महिन्याची मुदत मागणे योग्य नाही. आठ दिवसांत माहिती द्यावी. |
| ५ | २२६३ / पुणे | श्री. शंकरराव मल्हारी शिंदे तळेगाव ढमढेरे, (भैरवनाथ नगर) ता. शिरूर, जि. पुणे | उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, पुणे | शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, पुणे | सन १९९५ ते माहे सप्टेंबर २००७ पर्यंत कार्यरत असणा-या अपंगाच्या पदोन्नतीबाबत एकूण १२ मुद्दयांची माहिती | जन माहितो अधिकारी /अपिलीय प्राधिकारी यांनी एक महिन्यात माहिती देण्याचे प्रपत्रात नमूद केले आहे. माहितीची मागणी केल्यापासून ८ महिन्यांचा कालावधी लोटल्यानंतरही एक महिन्याची मुदत मागणे योग्य नाही. आठ दिवसांत माहिती द्यावी. |
| ६ | २२०० / पुणे | श्री. रमेश दामू मुंगसे द्वारा शिक्षणाधिकारी (निरंतर शिक्षण ), जिल्हा परिषद, पुणे | प्रशासन अधिकारी, शिक्षण संचालनालय (मा.व उ.मा.) महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-१ | शिक्षण उपसंचालक शक्षण संचालनालय (मा.व उ.मा.) महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-१ | सन २००७ या कालावधीतील विभागीय स्तरावरील कर्मचाऱ्यांच्या बदल्यांबाबत | जन माहिती अधिकारी यांनी १० दिवसांत माहिती देण्याचे प्रपत्रात नमूद केले आहे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ७ | २१९५ / पुणे | श्री. क्षितीज सत्यविजय शिंदे मु.पो.गावडे वाडी, ता.आंबेगाव, जि. पुणे | मुख्याध्यापक, विद्या विकास मंदिर, अवसरी बु. ता. आंबेगाव, जि. पुणे | शिक्षणाधिकारी माध्यमिक यशवंतराव चव्हाण भवन, जिल्हा परिषद, पुणे-१ | सन २००३ पासून माहे एप्रिल २००८ या कालावधी मध्ये श्रीमती एस.जी. हिंगे, श्री. के.एस. शिंदे व श्री. डी.बी. डुंबरे यांच्या नियुक्ती विषयक बाबी संबंधात एकूण १४ मुद्दयांची माहिती |
| ८ | २०१८ / पुणे | श्री. विठ्ठल मारूती भोर मु.पो.राजगुरूनगर तिन्हेवाडी रोड, ज्ञानेश नगरी, (नर्मदा) जि. पुणे | मुख्याध्यापक बोडकर कुडेश्वर विद्यालय पाईट, ता. राजगुरूनगर जि. पुणे | शिक्षणा-धिकारी माध्यमिक यशवंतराव चव्हाण भवन, जिल्हा परिषद, पुणे-१ | जून २००० ते एप्रिल २००७ या कालावधी तील शालेय फिरती रजिस्टर, हजेरीपट व कर्तव्य काला -वधीतील शिक्षकाने केलेल्या कामाचा अहवाल |
| ९ | २०१९ / पुणे | श्री. विठ्ठल मारूती भोर | मुख्याध्यापक श्री. गोसावी अंबिका विद्यालय, कन्हेरसर, ता. राजगुरूनगर जि. पुणे | शिक्षणाधिकारी माध्यमिक यशवंतराव चव्हाण भवन, जिल्हा परिषद, पुणे-१ | माहे जून २००७ ते माहे नोव्हेंबर २००७ या कालावधीत फिरती रजिस्टर, हजेरीपट, बुलेटिन रजिस्टर व कर्तव्य कालावधीतील शिक्षकाने केलेल्या कामाचा अहवाल |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १० | १७१४ / पुणे | श्री. रघुनाथ रामचंद्र जाधव रा. श्री. ज्योतीबा निवास, पुणे मुंबई महामार्ग, वडगांव, ता. वडगाव-मावळ, जि. पुणे | निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय वडगाव मावळ, जि. पुणे | तहसीलदार, वडगाव मावळ तहसील कार्यालय वडगाव मावळ, जि. पुणे | श्री. बबन म्हाळसकर, श्री. सोपान म्हाळसकर यांनी दि. २१.८.१९८७ रोजी केलेल्या अर्जाची प्रत व आपल्या कार्यालयाकडून सादर करण्यात आलेल्या दि. २७.१.२००८ रोजी केलेल्या अहवालाची प्रत | आवश्यक माहिती मिळाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. वरील तक्त्यात नमूद केलेली सर्व अपिले (क्र. २१६१, २१४३, २२७५, २२६८, २२६३, २२००, २१९५, २०१८, २०१९ व १७१४) निकाली काढण्यात येत आहेत.

२. अपील क्र. १७१४ वगळता अन्य अपिलांमध्ये विशिष्ट मुदतीत माहिती देण्याबाबत उभयतांमध्ये एकमत झाले आहे, असे वरील अपिलांमध्ये नमूद केले आहे तेथे पूर्तता करून जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी संबंधित मुदतीनंतर एक आठवड्यात अहवाल आयोगास सादर करावा. त्यानुसार पूर्तत न झाल्यास संबंधित अधिकारी नियमानुसार कारवाईस पात्र ठरतील.

पुणे
दि. ३१.१२.२००८

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.२३.१२.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता.

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी | विवेचन / निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २१८६/ पुणे | श्री.तुषार देविदास झेंडे मु.पो.म्हसोबाची वाडी, ता.इंदापूर, जि.पुणे | माहिती अधिकारी, पुणे विद्यापीठ, गणेशखिंड रोड, पुणे - ७ | कुलसचिव, पुणे विद्यापीठ, गणेशखिंड रोड, पुणे - ७ | १) विधी शाखा पदवी (सत्र पध्दत) अभ्यासक्रम प्रथम वर्षाच्या ऑक्टोबर २००७ च्या परीक्षेच्या व प्रथम वर्ष सत्र दुसरे मधील भारतीय संविधान या विषयाची उत्तरपत्रिकेच्या नकला २) विद्यापीठाने / परीक्षा मंडळाने उत्तर पत्रिका तपासण्यासाठी केलेल्या नमुना उत्तरपत्रिका | पुणे विद्यापीठात कायदा या विषयाचे नमुना उत्तरपत्रिका तयार करण्याची पध्दत नाही, विद्यापीठ अध्यादेश क्रमांक १४९ (८) च्या तरतुदीनुसार उत्तरपत्रिकांची छायाप्रत देता येत नाही व अध्यादेश क्रमांक १८२ ची प्रत अपीलकर्त्यास दिलेली आहे. असे जन माहिती अधिकाऱ्यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | २१८८/ पुणे | श्री.शरद दामोदर रानडे १६, श्री ओंकार हौ.सो., महाराणा प्रताप मार्ग, परदेशी आळी, पनवेल, जि.रायगड - ६ | माहिती अधिकारी, नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, पुणे - १ | उपमहानिरीक्षक (मुख्यालय), नोंदणी महानिरीक्षक (मुख्यालय), नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे - १ | मूळ दस्त क्र.८५/१९७९ परत मिळणेबाबत व सदर प्रकरणी झालेल्या विलंबाबात मुद्रांक शुल्काचा परतावा व्याजासह मिळणेबाबत | अपीलकर्त्याने यांनी शासनाच्या प्रचलित नियमानुसार संबंधितांकडे दस्त व परतावा मिळण्याबाबत विहित अर्ज करणे आवश्यक आहे. मुद्रांक शुल्क मिळणे ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही. |
| ३ | २१९१/ पुणे | श्री.नामदेव हनुमंत पाषाणकर रा.सी.पी.तलाव पोलीस चौकीसमोर, जुन्या एम.आय.डी.सी .पाण्याच्या टाकीजवळ, रामनगर नं.२८, वागळे इस्टेट, ठाणे - ४ | माहिती अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग, ता.खेड, जि.पुणे | अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, ता.खेड, जि.पुणे | खेड तालुक्यात सन २००४-२००६ या २ आर्थिक वर्षात विविध लेखाशीर्षाखाली करण्यात आलेल्या रस्त्यांच्या कामाची माहिती, रस्त्यांच्या पुर्णत्वाच्या दाखल्याची सत्य प्रती सदर कामावर दक्षता व गुणनियंत्रण मंडळाने नोंद केलेल्या मुद्यांच्या त्रुटी दूर केलेल्या कागदपत्रांचे अभिलेख इत्यादी. | याच विषयावर राज्य माहिती आयोग, कोकण खंडपीठ यांचे आदेश क्रमांक अपील क्र.केआर/३४६ /२००८, दि.०५.०७.०८ अन्वये कार्यवाही करण्यात येत असल्याने आदेशांची द्विरुक्ती टाळण्याकरिता राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठाकडून या अपिलावर कार्यवाही करण्याची आवश्यकता नाही. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | २२२४/ पुणे | श्री.अरुणकुमार सोमनाथ मुंदडा अरुणोदय एन्टरप्रायजेस, १ ला मजला, राणा बिल्डिंग हॉटेल पंचवटीच्या मागे, पद्मपुरा, औरंगाबाद | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासकीय मध्यवर्ती इमारत, पुणे - १ | अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासकीय मध्यवर्ती इमारत, पुणे - १ | सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीतील शासकीय विश्रामगृह पुणे च्या कार्यपध्दतीबाबत १५ मुद्यांची माहिती | माहिती देण्यास झालेला विलंब विचारात घेता अपिलकर्त्यास विनाशुल्क माहिती आठ दिवसांत द्यावी. |
| ५ | २२४३/ पुणे | श्री.शिवाजी रामा गायकवाड रा.वडगाव शेरी गावठाण, ता.हवेली, जि.पुणे | (१) मा.आयुक्त यांचे चिटणीस, पुणे विभाग, पुणे-४११ ००१ (२) चिटणीस , जिल्हाधिकारी कार्यालय पुणे, पुणे-४११ ००१ (३) निवासीनायब तहसीलदार, हवेली तहसील कार्यालय, पुणे- १ | उप आयुक्त (महसूल), पुणे विभाग, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे - १ | मौजे वडगावशेरी, ता.हवेली येथील सर्व्हे नं.५६ मधील पूर्वीच्या महार-जागले इनाम वर्ग ६ ब च्या जमीनीबाबतची माहिती | अपीलकर्त्याचे निधन झाले असल्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१) वरील तक्त्यातील अपिले ( क्रमांक २१८६, २१८८, २१९१, २२२४ व २२४३) निकाली काढण्यात येत आहेत.

२) अपील क्रमांक २२२४ प्रकरणी अपिलीय प्राधिकारी यांनी पूर्तता अहवाल या आदेशापासून ८ दिवसांच्या आत आयोगास सादर करावा. त्यानुसार पूर्तता न झाल्यास संबंधित अधिकारी नियमानुसार शास्ती व अन्य कारवाईस पात्र ठरतील.

**पुणे**
**दिनांक : ३१-१२-२००८**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**